# प्रेस नोट

## गुन्हे प्रकटीकरण, गुन्हे अन्वेषण विभाग, गुन्हे शाखा, मुंबई

### सुप्रसिध्द सिनेकलाकाराच्या घरावर गोळीबार करुन मुंबईत दहशत माजविण्याचा प्रयत्न करणारे गुन्हेगार गुन्हे शाखा, मुंबई यांचे कडुन जेरबंद

| | | |
|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | गुन्हे प्रकटीकरण, गुन्हे अन्वेषण विभाग, गुन्हे शाखा, मुंबई |
| ०२ | गु.र.क्र व कलम | ३९/२०२४ कलम ३०७, ३४ भा.दं.वि., १८६० सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम, १९५९ |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक :- १४/०४/२०२४ रोजी ०४.४५ वा. ते ०५.०० वा.चे दरम्यान |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक:- १४/०४/२०२४ रोजी ११.३२ वा. |
| ०५ | गुन्हयाचे घटनास्थळ | बी.जे.रोड, गॅलेक्सी अपार्टमेंन्ट बिल्डीग, बांद्रा (पश्चिम), मुंबई - ५० |
| ०६ | अटक आरोपी | एकुण दोन आरोपी अटक अंदाजे वय २५ वर्षे |
| ०७ | आरोपी अटक केल्याचे ठिकाण | भुज, गुजरात |
| ०८ | तपासी अधिकारी | पोलीस निरीक्षक श्री. सचिन पुराणीक, गु.प्र.शा. गु.अ.वि.,कक्ष-९, मुंबई |

दिनांक १४/०४/२०२४ रोजी ०४.४५ वा. ते ०५.०० वा.चे दरम्यान सुप्रसिध्द सिनेकलाकार सलमान खान यांचे बांद्रा(पश्चिम),मुंबई येथील निवासस्थानावर अग्निशस्त्राने गोळीबार करण्यात आला होता.

सदर घटनेबाबत सलमान खान यांचे अंगरक्षक यांच्या तक्रारीवरुन बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयाची जबाबदारी फेसबुक खातेधारक अनमोल बिश्नोई नामक इसमाने फेसबुक पोस्टव्दारे घेतली होती.

गुन्हयाचे गांभिर्य पाहुन गुन्हयाचा तपास तातडीने गुन्हे शाखे कडे वर्ग करण्यात आला. सदर गुन्हयाचे तपासासाठी गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकुण १२ पथके तयार करण्यात आली. सदर पथके मुंबई जवळील परिसर तसेच विविध राज्यात तपासासाठी रवाना करण्यात आली होती. गुन्हे शाखेने मानवी तपास कौशल्य व तांत्रिक बाबींचा वापर करुन ३६ तासांच्या आत अपराधी कृत्य करुन पळ काढलेल्या दोन गुन्हेगारांना भुज, गुजरात येथुन शिताफिने अटक केली. सदर गुन्याचे तपासात गुजरात पोलीसांची मदत घेण्यात आली.

सदरची प्रभावी कामगिरी गुन्हे शाखा, मुंबई च्या पथकाने मा. पोलीस आयुक्त श्री.विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री.देवेन भारती, मा.सह पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण) श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप-आयुक्त (डी-१) श्री.विशाल ठाकुर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक, कक्ष - ९ व पोलीस निरीक्षक भरत घोणे कक्ष - ११, तसेच गुन्हे शाखेतील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

Scanned with CamScanner